Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# ग्रामीण कादंबरी व राजकारण

**डॉ. सिंधू बाबाराव सोलापुरे**
मराठी विभाग,
श्री आसारामजी भाऊवलदार महाविद्यालय
देवगाव रं, ता.कन्नड,जि. औरंगाबाद

राजकारण आज मानवी जीवनाचे अविभाज्य अग बनले आहे. मानवी जीवनाचे चित्रण साहित्यात कलात्मक पद्धतीने साकार केलेले असते; म्हणूनच साहित्याला समाजाचा आरसा महणतात. आधुनिक भारतीय राजकारणाचे स्वातंत्र्य पूर्वकालीन ध्येयवादाधिष्ठीत त्यागमय कालखंड व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा सत्ताधिष्टित कालखंड मानता येईल. १८१८ मध्ये ब्रिटिशाची भारतावरील राजवटीची पकड भक्कम झाली त्यासोबत त्यानी पाश्चत्य शिक्षणाची सुरुवात केली उदारमतवादी, विज्ञाननिष्ठ विचारवताचे ग्रंथ वाचून तत्कालीन शिक्षित पिढी राजकीय चळवळीत सहभागी झाली. त्यातूनच १८५७ चा उठाव झाला, परंतु त्यामागे वैचारिक बैठक नव्हती. त्यासाठी व्यापक राजकीय प्रयत्न झाले नाही त्यामुळे हा उठाव दडपण्यात ब्रिटिश यशस्वी झाले.

लोकहितवादी, न्या. रानडे, म. फुले यांच्या विचारानी तत्कालीन राजकीय व सामाजिक चळवळीची पायाभरणी केली. म. फुले हे भारतीय सामाजिक जातीचे आद्यजनक आहे. म. फुलेच्या स्मृतिशताब्दीच्या निमित्ताने १९९१ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार म्हणतात, "आज चालू असलेल्या सर्व चळवळीचा पाया महात्मा फुल्यांनी घातल्यामुळेच त्यांना पहिले नमन केले जाते. फुल्याचे स्त्रिशिक्षणाचे, ग्रामसुधाराचे, शेतकरी विकासाचे, कृषी औद्योगिक जीवनाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपली धडपड चालू आहे. म. फुल्यांनी पुरस्कारलेला सर्वधर्म समभाव हा अत्यंत महत्वाचा राष्ट्रीय विचार आहे. फुल्याचा पुरोगामी विचार पुढे नेण्याचा महाराष्ट्र शासनाचा निर्धार आहे."

साहित्य हे समाजजीवनाचे प्रमुख अंग आहे. साहित्याला समकालीन सामाजिक आणि राजकीय जीवनातून आशयद्रव्य मिळत असते. त्यामुळे सामाजिक, राजकीय बदलाबरोबर साहित्यातही बदल होतात. समकालीन प्रश्नांना साहित्यातून आविष्कृत केले जात असते. आणि तसा प्रयत्न करणारे साहित्य अधिक वास्तवसन्मुख ठरते. याच पार्श्वभूमीवर १९६० च्या आसपास मराठी साहित्यात विविध वाडमयप्रवाह निर्माण झाले. त्यापैकी ग्रामीण साहित्याचा प्रवाह लक्षणीय आहे. म. फुलेंची विचारसरणी ग्रामीण साहित्याची वैचारिक व तात्विक भूमिका आहे. राजकारणाचे ललित साहित्यातील चित्रणाविषयी ग.प्र. प्रधान म्हणतात, "राजकारणाचे ललित साहित्यात चित्रण सोपे नाही, याचे कारण राजकारण हा कल्पनेच्या सहाय्याने रंगविण्याचा विषय नाही. राजकारणाला विलक्षण धग असते. स्वातंत्र्य पूर्वकाळात

जी माणसे राजकारणाकडे आकृष्ट झाली त्यांना स्वातंत्र्य लढयाव्यतिरिक्त जीवनातील अन्य सर्व गोष्टी गौण वाटल्या, स्वातंत्र्यलढ्यात स्वत:ला झोकून देणाऱ्या कार्यकर्त्यांच्या ध्येयासक्त जीवनाचे वास्तव चित्रण मराठी साहित्यात झालेले नाही."

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय खेडयांचे पारंपरिक स्वरूप बदलले लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला गेला. प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार मिळाला. त्यामुळे गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत वातावरण बदलून गेले. हे सर्व चित्रण साहित्यातून प्रस्तुत होणे अपरिहार्य होते. कारण साहित्यिक हा जनसामान्यांचा प्रश्नांना साहित्यातून पर्याय सुचविणारा मार्गदर्शक असतो. एकीकडे स्वातंत्र्य व मतदानाचा अधिकार मिळाल्याच्या आनंदात सामान्य जनता असताना, दुसरीकडे स्वार्थी राजकारणी या अज्ञानी लाचार जनतेच्या अधिकाराचा गैरवापर करू लागले. शासनाच्या विविध योजना स्वतःच्या स्वार्थासाठी वापरू लागले. सर्व सामान्य जनतेसमोर दैन्य, दारिद्रय, निरक्षरता हे प्रश्न कायम आहेत.

या सर्व प्रश्नांचे प्रतिबिंब ग्रामीण कादंबऱ्यामधून आलेले असले तरी या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा प्रयत्न झालेला दिसून येत नाही साधारणपणे १९८० नंतर राजकारण्यांची पहिली पिढी संपली व नवीन पिढी राजकारणात येऊ लागली, त्यापूर्वीच्या पिढीतील राजकीय नेत्यावर म. गाधीच्या विचाराचा पगडा होता. परंतु नंतरच्या राजकारण्यानी वैयक्तिक सत्ताकांक्षेला महत्व दिल्यामुळे ग्रामीण राजकारण व समाजजीवनावर याचा परिणाम झाला. या सर्व गोष्टीमुळे ग्रामीण जीवन हादरून गेले ग्रामीण राजकारण हे शहरी राजकारणापेक्षा वेगळे असते गावामध्ये अनेक पिढ्यापासून लोक एकत्र राहत आलेले असतात. त्याच्यामध्ये जाती-धर्माचे, सण-उत्सवाचे, भाऊबंदकीचे, हेव्यादाव्याचे राजकारण स्वार्थापोटी चालते. शासकीय योजना, सहकारी कारखाने, बँका, सोसायट्या, दुधसंस्था राजकारण्यांना चरण्यासाठी उपलब्ध झालेलो कुरणे आहे. ग्रामीण, दलित, शोषित, जनतेची लूट त्यांचेच पुढारी करतात. लाचार, व्यसनाधीन जनता त्यांच्या आहारी जाते आणि स्वतःचे अस्तित्व गमावून बसते. या सर्वांचे प्रतिबिंब ग्रामीण कादंबऱ्यातून दिसून येते.

राजकारण म्हणजे सत्ता स्पर्धेचा सतत चालणार खेळ असतो. एकदा सत्तेची सवय लागली की तिचा हव्यास निर्माण होतो. सद्य स्थितीमध्ये ग्रामीण पातळीवर सत्तेची अनेक केंद्रे निर्माण झाली आहे. 'गावगाडा' नावाची व्यवस्था आता नष्ठ होऊन पंचायतराज अंतर्गत जिल्हापरिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या स्वरूपाची राज्यव्यवस्था आणि केंद्रीभूत असलेली न्यायव्यवस्था निर्माण झाली. तसेच शेतीमालाची बाजारपेठ, बाजार समित्यांसारखी व्यवस्था, आडते बाजार व विविध सहकारी सोसायट्या या दोन्हीत दुभंगली गेली. यामुळे सपूर्ण ग्रामीण जीवन राजकीयदृष्ट्या ढवळून निघाले, राजकारण या शब्दाला दोन अर्थ रूढ झाले. एक राजनीती व दुसरा लबाडी यात राजनीतीला दुय्यम स्थान प्राप्त झाले;

आणि दुसरा अर्थ मात्र अधिक रूढ झाला आहे. या लबाडी राजकारण्याचे चित्रण ग्रामीण कादंबऱ्या मधून आलेले आहे.

सत्ता आणि मानव यांचा आदिम संबंध आहे. ते परस्परांशी इतके एकरूप झाले आहेत की, सत्तेशिवाय मानव अपूर्ण आहे आणि सत्ता मानवाला आकर्षित करते. सत्ता अबाधित राहण्यासाठी माणसे जशी जोडली जातात तशी त्यांची खरेदी-विक्रीही केली जाते. राजकारणाने आज प्रत्येकाला प्रभावित केले आहे. विविध स्तरावरील निवडणुका त्यासाठीचा पक्षाचा प्रचार, निवडणुकीचे वातावरण, विविध माध्यमांद्वारे होणारी चर्चा यामुळे संबंध समाजामध्ये राजकीय जागृती झाली आहे. राजकीय चित्रण असणाऱ्या जवळपास सर्वच कादंबऱ्यांमध्ये सत्तेचे राजकारण हेच मध्यवर्ती सूत्र दिसून येते, सत्ता मग ती कोणत्याही पातळीवरील असो तो मिळविण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्न करतो, राजकारणाचा प्रत्येक गोष्टींमध्ये झालेला शिरकाव, नीतिमूल्याचा झालेला ह्रास थक्क करून सोडतो, राजकीय पक्ष व नेत्यांनी तयार केलेली राजकारण्याची नवी जमात प्रत्येक गावागावात पसरत आहे. कुध्यांसारखे जातीचे तणकट घट होत आहे. संपूर्ण समाजालाच भिरूड लागले आहे. याचे विविधांगी व प्रायोगिक दर्शन विविध कलाकृतींमधून घडते. लोकशाही राज्यव्यवस्थेमुळे राजकारण अधिक गुंतागुंतीचे झाले आहे, याविषयी विलास खोले म्हणतात, "आजच्या आधुनिक काळात अर्थकारण, समाजकारण व राजकारण ही अंगे एकमेकांमध्ये इतकी मिसळून गेली आहे की, त्यांना वेगळ्ये स्वतंत्र क्षेत्र मानण्यापेक्षा एकंदर सामाजिक व्यवहाराकडे पाहण्याचे हे दृष्टिकोन आहेत, कोणतेही आंदोलन किंवा संप यांचा अंतिम हेतू हा कोणत्या प्रकारे सत्तासंपादनाशी असतो."

सत्तेच्या राजकारणाचे चित्रण अनेक ग्रामीण कादंबऱ्यांमधून आलेले दिसून येते, उदा, काळी आई, आमदार, सौभाग्यवती, मेड इन इंडिया, पाटीलकी, रौदांळा इ. या प्रत्येक कलाकृतीचा संघर्ष भिन्न आहे आजच्या काळातही राजकीय संघर्ष पराकोटीला पोहचला आहे. प्रत्येक राजकीय व्यक्ती आपल्याला कोणतेतरी पद मिळावे किंवा सत्तेत सहभागी होता. यावे म्हणून श्रेष्ठीपुढे नतमस्तक होतात.

जागतिकीकरणामुळे व्यक्ती भौतिक साधनाच्या, सुखासीन जीवनाच्या, चंगळवादाच्या आहारी जाऊन आपली मूळ, अस्तित्व आणि ओळख हरवत चालण्याचे जाणवते पाणी प्रश्न आज गंभीर बनला आहे. धरणग्रस्ताचे प्रश्न, दलित, आदिवासींचे प्रश्न, सर्वच जातींना आरक्षण हवे आहे व त्यासाठी राजकीय पक्षाकडून केले जाणारे राजकारण यामुळे सर्व सामान्य जनता सैरभैर झाली आहे. महामानवाच्या पुतळ्यासाठी त्यानी शिकवलेली मूल्ये, मानवता आज पायदळी तुडवली जात आहे. याचेही चित्रण भिरूड, तणकट, पांगीरा सारख्या ग्रामीण कादंबऱ्यांमधून आलेले दिसून येते. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनातील राजकारणाचे चित्रण 'झाडाझडती' व 'काळी आई' मधून आले आहे तर सेझ सारख्या चांगल्या योजनाही चुकीच्या पद्धतीने राबविल्यामुळे स्थानिकाना होणारा विरोध याविषयी चित्रण 'सेझ'

मधून आले आहे. ग्रामीण जीवनातील राजकारणाच विविध स्तर, आणि स्वरूप हे विविध ग्रामीण कादंबऱ्यांमधून आलेले दिसून येते. सत्तेच्या राजकारणाचे चित्रण प्रामुख्याने मेड इन इंडिया, आमदार सौभाग्यवती, नामदार श्रीमती, पाटीलकी, रौंदाळा इ. मध्ये आलेले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही शासन पद्धतीमुळे तसेच पंचायत राज व्यवस्थेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन इच्छुकाना राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली त्यामुळे राजकीय जागृती वाढली आहे परंतु अलीकडे वैयक्तिक सत्ताकांक्षेला महत्व आल्यामुळे राजकारणामध्ये मूल्यहीनता वाढली आहे. निवडणुकामध्ये होणारा काळाबाजार, सट्टेबाजी, मतांची विक्री, पार्ट्या, ओल्या पार्ट्या, यात ग्रामीण जनताही मागे राहिलेली नाही शेतकऱ्यांच्या गुणवंत मुलाना शिक्षण घेऊनही पैसे आणि वशिला नसल्यामुळे नोकरी मिळत नाही, शैक्षणिक संस्थामध्ये शिक्षक, प्राध्यापक होण्यासाठी लागणारे भरमसाठ डोनेशन ते देऊ शकत नाही, कारण त्यांच्याजवळ असणारी एकमेव सपंती म्हणजे 'काळी आई' आणि तो त्यांचे आईवडील विकू देत नाही याचे प्रतिबिंब अनेक कलाकृतीतून आलेले आहे.

भारतीय समाजाला जातीयतेचे, वर्णभेदाचे लागलेले भिरूड' दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी वाढतच चालले आहे. माणसे पुतळ्यासाठी माणसांची अस्मिता पायदळी तुडवतांना दिसतात. याचे चित्रण भिरूड' व 'तणकट' मधून आलेले आहे. ग्रामपातळीवरील राजकीय संघर्ष, दुभंगलेली मने, गटागटाचे राजकारण, निवडणुकीच्या निमित्ताने हिंदळून निघणारा गाव, राजकारण्यांनी गावाचा केलेला नाश याचे चित्रण रौंदाळा व कुंधा या कादंबरीमध्ये आलेले आहे. राजकारणामुळे निर्माण होणारा दलित-सवर्ण संघर्ष तसेच दलित चळवळीतील राजकारणामुळे होणारा गावाचा नाश याविषयी भाष्य तणकट भिरूड व रौदांळा मधून आलेले दिसून येते. आजच्या खेड्याचे प्रभावी चित्रण 'मेड इन इंडिया, 'पांगिरा' यामधून आलेले आहे. सहकारी चळवळ आणि सत्तेचे विकेंद्रीकरण यातून अपेक्षित परिणाम साधलेच नाहीत. उलट अनपेक्षित परिणाम मोठ्या प्रमाणात पुढे आले आहे. सहकार आज स्वाहाकार कसा झाला आहे. याचे प्रतिबिंब विषवृक्षाच्या मुळयामधून आलेले आहे.

आमदार सौभाग्यवती व नामदार श्रीमतीमधून नात्यागोत्याचे राजकारण, कौटुंबिक राजकारण आणि आजच्या राजकारणाचे वास्तव चित्रण काल्पनिक पद्धतीने अतिशय संयमीपणे व्यक्त केले आहे. ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब अनेक कादंबऱ्यामधून आलेले आहे, इथला शेतकरी त्याच्या शेतीमधून कसा उखडला जात आहे, याचे चित्रण सदानंद देशमुख, अशोक कोळी, कृष्णात खोत, गणेश आवटे याच्या कादंबऱ्यांमध्ये प्रकट होते.

एकंदरीत १९८० नंतरच्या सर्वच ग्रामीण कादंबऱ्यामध्ये राजकारणाचे प्रतिबिंब आलेले दिसून येते. महाराष्ट्रातील बदलत्या सामाजिक व राजकीय जीवनाला या कादंबऱ्या अधोरेखित करतात. सध्याचे

राजकारण व समाजजीवन मूल्यहीन, तत्वहीन बनून जात, धर्म, भाषा, अर्थसत्ता यांच्या आहारी गेल्याचे दिसून येते. आपल्या ऐपती बाहेरील केलेल्या खर्चामुळे सर्वसामान्य शेतकरी कसा नागवला जात आहे याचेही प्रतिबिंब येते. या काळातील कादंबरी आशय, विषय, तंत्र, भाषाशैली, निवेदन पद्धती या सगळ्याचा अंगांनी प्रयोगशिलता जपणारी दिसते. असे असले तरी साधारणपणे ९०च्या कालखंडातील आलेल्या जागतिकीकारणामुळे निर्माण झालेल्या समस्यांना मराठी कादंबरी अधोरेखित करत नाही.

जागतिकीकरणामुळे समाजव्यवस्थेत झालेले परिवर्तन उद्योग व 'बाजार' व्यवस्थेमध्ये झालेल्या क्रांतीचे प्रभावी चित्रण काही थोड्या साहित्यिकांचा अपवाद वगळता कुणी करताना दिसत नाही. 'सेझ' मधून सुपीक जमिनी उद्योगासाठी जाणार म्हणून तेथील भूमिपुत्रांनी केलेला संघर्ष वास्तव स्वरूपात रेखाटण्यामध्ये शंकर सखाराम यशस्वी झाले आहे. असे असले तरी जागतिकीकरणामुळे व आधुनिक गतिशील राजकारणामुळे निर्माण झालेल्या समस्या ती नीटपणे मुखर करू शकत नाही. मात्र त्या दिशेने सुरू असलेली वाटचाल निश्चितच स्वागतार्ह आहे.

**संदर्भ-**

१. महात्मा फुले समग्र वाडमय, (संपा) य. दि. फडके, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पाचवी आवृत्ती, १९९१ पृ.४

२. महाराष्ट्रातील राजकारणाचे साहित्यातील प्रतिबिय, (सपा) विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९९८. पृ. १७

३. गेल्या अर्धशतकात मराठी कादंबरी, (सपा) विलास खोले लोकवाड्मयगृह प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती २००२, पृ. ९८

४. साहित्य आणि सामाजिक बांधिलकी, नागनाथ कोतापल्ले, अक्षरगाथा, नांदेड, १० जाने २०१४, पृ. १०७

५) आधुनिक महाराष्ट्राचे राजकाला, व म. सिरसीकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००१

६) मराठीतील राजकीय कादबरी, संपा श्रीकात तिडके - प्रतिभा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २०११

७) साहित्य: निर्मिती व समीक्षा, दि. के. बेडेकर, लोकवाड्मयगृह, मुंबई. सहावी आवृत्ती २००८.